# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): भंडारा **P.S.**(ठाणे): मोहाडी **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0050 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/04/2019 20:26 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (अ) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 05/03/2019
**Date To** ( दिनांक पर्यंत): 05/03/2019
**Time From** (वेळेपासून): 08:50 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 22:50 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 22/04/2019 **Time** (वेळ): 20:14 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद 020 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 22/04/2019 20:14 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 2 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तहसिल कार्यालय मोहाडी , मोहाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नरेश माणिक ईश्वरकर
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)
(c) **Date/Year of Birth** (जन्म 1981 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):
**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

<u>फिर्याद</u>

दिनांक:—२२/०४/२०१९.

मी नरेश माणिक ईश्वरकर वय ३८ वर्षे रा. रोहणा पोस्ट बेटाळा ता मोहाडी जि भंडारा.

मी दिनांक ०४/०३/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी, ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष तीन लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

'' मी समक्ष हजर राहुन तक्रार देतो कि मी मौजा रोहणा येथे राहत असून मी रेती व गिटटी वाहतूकीचा व्यवसाय करतो. मोहाडी तालुक्यातील बेटाळा गावाजवळुन वाहणा—या वैनगंगा नदीच्या पात्रातुन वाळु काढुण ती वाळु नदीच्या काठावर आणुन वाळुचा साठा करून ठेवतात. त्यानंतर साठा झालेली वाळु जेसीबी च्या सहाय्याने टॅक व टिप्पर मध्ये व्यापारी भरून घेवून जातात. सध्दया जिल्हयातील कोणत्याही रेती घाटाचा लिलाव झाला नसल्याने हा व्यवसाय जोरात सुरू आहे. एक ट्रॅक किंवा टिप्पर वाळु जेसीबी ने भरण्याचे ६००/— रू. मिळतात. त्यामुळे काठावरील वाळु ट्रक किंवा टिप्पर मध्ये भरण्यासाठी मी दिनांक २८/२/१९ रोजी कामठी येथून श्री. योगिराज पराते यांचेकडील जेसीबी वाहन क्र. एम. एच. ४०/ बी.एफ. ३२९९ ही मशिन किरायाने आणली व ती बेटाळा येथिल नदी काठावरील जमा असलेला रेती साठा ट्रक व टिप्पर मध्ये भरून देवून उत्पन्न कमावण्याच्या उद्देशाने आणली होती. सदर जेसीबी मशिन ही बेटाळा या ठिकाणी मुक्कामी असायची व तेथूनच चालक जेसीबी. मशिन नदी काठावर घेवून जावून रेती साठा ट्रक /टिप्पर मध्ये भरण्याचे काम करीत असे.

दिनांक ०२/३/१९ रोजी शनिवारी रात्रौ ११/०० वा सुमारास मला मोरश्वर पंचबुध्दे यांनी सांगितले कि तू किरायाने आणलेली जेसीबी मशीन कातकडे साहेबांनी पकडली व ते जेसीबी मशिन ताब्यात घेउन जात आहेत. त्यावेळी जेसीब वर गणेश हा चालक होता. अशी माहिती मिळाल्याने मी लगेच बेटाळा या गावाकडे जाण्यासाठी निघालो असता मला बेटाळा गावाजवळ जेसीबी मशिन व त्यामागे कातकडे साहेबांची गाडी दिसली. मला पाहिल्यावर श्री कातकडे साहेबांनी गाडी थांबवली. तेव्हा मी कातकडे साहेबांना सांगितले कि, साहेब नदीकाठावर चार—पाच जेसीबी मशिन टॅक/टिप्पर मध्ये वाळु भरण्याचे काम करतात. तुम्ही फक्त माझी जेसीबी मशिन का पकडली? तुम्ही मी किरायाने आणलेली जेसीबी मशिन कोठे घेउन चाललात? असे विचारले असता कातकडे साहेबांनी म्हटले कि, तू ही जेसीबी मशिन बेकायदेशिर रित्या वाळू खणन करण्यासाठी आणलेली आहेस. तुझी जेसीबी मशिन पोलीस ठाणे येथे लावतो व नंतर चौकशी करू असे म्हणाले.

नंतर कातकडे साहेब यांनी गणेश यास जेसीबी मशिन ही मोहाडी पोलीस ठाणे येथे घेण्यास सांगितली. मी,कातकडे साहेब असे जेसीबी मशिनसह पोलीस ठाणे मोहाडी येथे पोहचलो. कातकडे साहेबांनी जेसीबी मशिन पोलीस ठाणे आवारात मशिन चालकास लावण्यास सांगितले. नंतर कातकडे साहेब माझेजवळ येवून म्हणाले कि, मशिन सोडायची असेल तर पाच लाख रूपये दयावे लागतील. नाहीतर तू बेकायदेशिर रित्या वाळू खणन करतो म्हणून साडेसात लाख रूपयाचा दंड लावेन. त्यावर मी कातकडे साहेबांना म्हणालो कि, माझेकडे एवढे पैसे नाहीत. त्यावर कातकडे साहेब म्हणाले कि तिन लाख रूपये जमव. मी जेसीबी मशिन सोडतो. माझेकडे पैसे नसल्याने मी पुन्हा त्यांना विनंती करून मशिन सोडणेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि तू कमीत कमी दोन लाख रूपये दयावे लागतील. तरच मी तुझी जेसीबी मशिन सोडेन. नाहीतर साडेसात लाख रूपयाचा दंड भरण्यास तयार रहा. त्यावर मी नाईलाजाने दोन लाख रूपये देण्यास तयार

नरेश ईश्वरकर

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रोहणा ,मोहाडी ,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रोहणा ,मोहाडी ,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9970821413

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | एकनाथ दत्तात्रेय कातकडे | | | 1. तकिया वार्ड भंडारा ,भंडारा,भंडारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | देविदास तुळशिराम धुळे | | | 1. नेहरू वार्ड मोहाडी ,मोहाडी ,मोहाडी, भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीस त्यांनी किरायाने आणलेली जेसीपी मशिन क्रमांक MH40/BF 3299 हिस पो.स्टे.मोहाडी येथे श्री. कातकडे नायब तहसिलदार यांनी पो.स्टे.मोहाडी येथे अडकावून ठेवलेली असल्याने त्यांचे वतीने कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता सोडून देण्या करीता व वाम मार्गानी गैरफायदा मिळविण्या करीता दोन लाख रूपयाची लाचेची मागणी करून ते मिळवण्याचा प्रयत्न केल्याने वरील अधिनीयमा द्वारे दोन्ही आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): shivaji bhimrao kadam(I (Inspector)) / 1979 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

झालो. परंतु मागणी केलेली लाच रक्कम ही जास्त असल्याने मी पैसे जमवण्यासाठी दोन तिन दिवसांचा वेळ मागितला. यावर कातकडे साहेब म्हणाले ठिक आहे पण यापुढील बोलणी व पैशाचे व्यवहार करण्यासाठी तू माझा लहान भाउ एकनाथ कातकडे किंवा धुळे बाबू यांना भेट. माझेकडे परत येवू नको. पुढील व्यवहार हे एकनाथ किंवा धुळेबाबू पाहतील. असे म्हणून ते पोलीस ठांणे येथून निघून गेले. नंतर मी घरी गेलो. दिनांक ०३/०३/१९ रोजी रविवार असल्याने पैशाची जुळणी झाली नाही. मी किरायाने आणलेला जेसीबी ही विनाकारण पोलीस ठाणे येथे लावून कारवाई करण्याची भिती दाखवून मला दोन लाख रूपये लाचेची मागणी केली. ती लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नाही.

आज दिनांक ०४/३/१९ रोजी सकाळी मला श्री धुळे साहेब यांनी माझे गावात राहणारा सचिन मारवाडे याचे मोबाईलवरून फोन करून सांगितले कि, तू मला तुझे जेसीबी मशिन संदर्भात बोलणी करणेसाठी कोका येथे ये. आज तेथे यात्रा असल्याने मी सचिन सोबत कोका येथे जात आहे. कातकडे साहेबांनी मला तुझे जेसीब संदर्भात सर्व सांगितले आहे. आपण कोका येथे भेटु. आज श्री धुळे साहेब मला पैशासंदर्भात बोलणी करणार असल्याने मला त्यांना भेटायला कोका येथे जावयास लागेल. मला कातकडे साहेबांनी दोन लाख रूपये लाचेची मागणी केली ती रक्कम मला त्यांना दयावयाची नाही. म्हणून मी त्यांचेवर पुढील कारवाई कामी तक्रार देत आहे.

वरिल तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पारधी, साहेब यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना ला. प्र. वि. च्या कार्यालयामध्ये कार्यवाही कामी बोलावून घेतले. त्यांचे समक्ष मी दिलेली तक्रार पुन्हा वाचण्याकरीता दिली व त्याचेवर सहया केल्या. पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या.

पडताळणी दरम्यान श्री. धुळे, लिपीक यांनी स्पष्ट लाचेची मागणी न करता माझी किरायाने आणलेली जेसीबी मशिन पो.स्टे. मोहाडी येथुन सोडुण देण्याकरीता दिनांक ०५/०३/१९ रोजी तहसिल कार्यालय मोहाडी येथे बोलाविले होते. मी पंचासह परत आल्यावर श्री. पारधी, साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.

दिनांक ०५/०३/१९ रोजी पडताळणी दरम्यान श्री. कातकडे, लिपीक व श्री. धुळे, लिपीक तहसिल कार्यालय मोहाडी यांनी पो. स्टे. मोहाडी येथे श्री. कातकडे, नायब तहसिलदार साहेबांनी जमा केलेली जेसीबी. मशिनवर कार्यवाही न करता सोडुन देण्याकरीता २,००,०००/- रूपयाची लाचेची मागणी केली. ती लाच रक्कम त्यांचे तहसिल कार्यालय, मोहाडी येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. मी पंचासह परत आल्यावर श्री. पारधी, साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.

दिनांक ०६/०३/१९ रोजी पडताळणी दरम्यान श्री. कातकडे, नायब तहसिलदार तहसिल कार्यालय मोहाडी यांनी जेसीबी मशिन सोडुण देण्याकरीता लाचेची मागणी केली नाही.

दिनांक ०८/०३/१९ रोजी मी १,३०,०००/- रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी साहेब आणि दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यामध्ये त्यांनी त्यांचे कार्यालयामधिल खेळण्यातील २०००/- रूपयेच्या दराच्या एकुण ३५ नोटा असे ७०,०००/- रू. त्यामध्ये समाविष्ठ केले. त्यांनी त्याचेवर पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

सापळा अधिकारी श्री. पारधी साहेबांनी मोहाडी येथिल परमात्मा एक देवस्थानामधुन पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले. सापळा कार्यवाही अगोदर मी माझे मित्र श्री. झंझाळ यांचे कडुन श्री. कातकडे, लिपीक व श्री. धुळे लिपीक, तहसिल कार्यालय मोहाडी येथे हजर आहे

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

नरेश [signature]

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]
ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, मोहाडी
जि. भंडारा

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): ~~shivaji bhimrao kadam~~

**Rank**(पद): ~~I (Inspector)~~

**No.**(सं.): 1979

नापोशि संजय दुधराम मेश्राम
ब.न. ८४६, पो.स्टे.मोहाडी

किंवा कसे? याबाबत माहीती घेतली ते त्यांचे कार्यालयामध्ये हजर नव्हते. त्यामुळे ते तहसिल कार्यालय, मोहाडी मध्ये हजर होण्याची वाट बघत परमात्मा एक देवस्थान, मोहाडी येथेच थांबुन होतो. त्यानंतर काही वेळाने माझे मित्र श्री. झंझाळ यांनी माहीती घेवून सांगितले की, ते गसतीवरून परस्पर आपले घरी निघून गेले आहेत.

दिनांक ११/०३/१९ रोजी सुचनेप्रमाणे सापळा अधिकारी श्री. पारधी साहेबांनी मोहाडी येथिल शेतशिवारातुन सापळा कार्यवाही केली. कार्यवाही करीत असतानां माझे गळयात व्हाईस रेकॉर्डर लावून पावडर लावलेल्या चलनी नोटा ज्यात २,०००/– रू. च्या २५ नोटा, ५००/– रूपयाच्या १६० नोटा आणि नकली २०००/– रू. दराच्या ३५ नोटांचा समावेश होता, त्या माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. बाभरे यांचे हस्ते ठेवुन श्री. कातकडे, लिपीक व श्री. धुळे लिपीक, तहसिल कार्यालय मोहाडी यांचे कार्यालयात पाठविले असता दोन्ही त्यांचे कार्यालयामध्ये हजर नव्हते.

दिनांक १२/०३/२०१९ रोजी सापळा अधिकारी री. पारधी साहेब यांचे सुचनेप्रमाणे पुढील सापळा कार्यवाही करण्यात आली. सापळा कार्यवाही दरम्यान श्री. कातकाडे, लिपीक यांनी माझे कडुन लाच रक्कम न स्विकारता व काही न सांगता परस्पर बाहेर निघुन गेले व मला म्हटले की ''तुम्ही थांबा मी येतो दहा मिनीटात. कशाला, फोन करतो न मी तुम्हाला करतो फोन'' असे म्हणुन बाहेर निघुन गेले. तसेच श्री. धुळे, लिपीक यांनी लाच रक्कमेबाबत मला म्हटले की, ''पहीले फोन आणा मग काहीच करा तुम्ही. सगळा रेडी आहे न माझाजवळ'' असे म्हणुन दोन्ही गै.अ. यांनी माझेकडुन लाच रक्कम स्विकारण्यास असमर्थता दर्शविली. काही वेळाने मी श्री. कातकडे, लिपीक यांचे मोबाईल क्रंमाकावर दोनदा फोन लावले असता त्यांनी माझे फोन रिस्विह केले नाही.

श्री. कातकडे, लिपीक व श्री. धुळे लिपीक, तहसिल कार्यालय मोहाडी यांनी मी किरायाने आणलेली जे.सी.बी. मशिन पो. स्टे. मोहाडी येथे श्री. कातकडे, नायब तहसिलदार यांनी अडकावून ठेवलेली असल्याने त्यांचे वतीने कोणतीही कायदेशिर कार्यवाही न करता सोडुन देण्याकरीता आणि वाम मार्गाने गैरफायदा मिळविण्याकरीता दोन लाख रूपयाची लाचेची मागणी करून ती मिळविण्याचा प्रयत्न केल्याने श्री. कातकडे, लिपीक व श्री. धुळे लिपीक, तहसिल कार्यालय मोहाडी जि. भंडारा यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाहीस्तव: मी फिर्याद देत आहे.

माझी वरिल फिर्यादी बयाण वाचून पाहीला, ते माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

नरेश ...

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**